# मुंबई विद्यापीठ

**मानव संसाधन विकास कक्ष**
एम्.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in
ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in
दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४


---

क्र.मासंविक/इसीडी/२०२५-२६/७०३ दि. १५ ऑक्टोबर, २०२५

**वाचा :** १) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ६७ दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९
२) The Gazette of India, Extraordinary, Part III-Sec.4 UGC Notification dated 11th April, 2023

**कार्यालयीन आदेश :-**

मा. न्यायाधीश श्री. शशिकांत सावळे, (सेवानिवृत्त) यांना सदर आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त वाचा येथे नमुद राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ ( विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा ) एकरुप परिनियम, २०१९ व University Grants Commission (Redressal of Grievances of Students) Regulations, 2023 मधील तरतूदीनुसार संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाविरुध्दच्या अपिलांवर सुनावणी करण्याकरिता व निर्णय देण्याकरीता त्यांची 'लोकपाल' या पदावर दिनांक २७/१०/२०२५ पासून पुढील सहा महिन्यांकरीता किंवा पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अंशकालिक तत्वावर खालील अटी व शर्तींच्या अधीन नियुक्ती करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) लोकपाल हा, लोकपाल म्हणून नियुक्त होण्याच्या वेळी, अशा नियुक्तीपूर्वीच्या एक वर्षामध्ये किंवा लोकपाल म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान, जेथे त्याचे व्यक्तिगत नाते-संबंध, व्यावसायिक संलग्नता किंवा आर्थीक हितसंबंध यांमुळे त्याला विद्यापीठाबाबतच्या निर्णयशक्तीच्या स्वातंत्र्याशी तडजोड करावी लागेल अथवा तो तडजोड करीत असल्याचे वाजवीरीत्या दिसून येईल अशा बाबतीत, त्याचा विद्यापीठाच्या हितास विरोध असता कामा नये.

२) लोकपाल, किंवा त्याच्या जवळच्या कुटुंबातील कोणताही सदस्य,

(एक) विद्यापीठातील लाभाच्या पदाच्या अशा कोणत्याही पदावर किंवा नोकरीमध्ये मागील एका वर्षामध्ये कोणत्याही परिस्थितीत पद धारण करणार नाही किंवा त्याने पद धारण केलेले असणार नाही ;

(दोन) विद्यापीठाशी वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक अथवा आर्थिक संबंधासह कोणताही महत्वपूर्ण नातेसंबंध ठेवणार नाही ;

(तीन) विद्यापीठाच्या प्रशासन किंवा शासनसंरचनेत, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे, विद्यापीठातील कोणतेही पद धारण करणार नाही.

३) लोकपालास, प्रकरणांची सुनावणी घेण्याकरिता, वाहतूक खर्चाच्या प्रतिपूर्ती व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्याप्रमाणे प्रति दिन बैठक फी देण्यात येईल.

४) लोकपालावरील गैरवर्तनाचे किंवा दुर्व्यवहाराचे किंवा उपरोक्त (१) व (२) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केल्याबाबत आरोप सिध्द झाल्यास, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने, कुलगुरु त्यास पदावरुन दूर करील.

**कुलगुरु**
**मुंबई विद्यापीठ**

**प्रती,**
मा. न्यायाधीश श्री. शशिकांत सावळे, (सेवानिवृत्त)
६०४, उन्नती टॉवर, प्लॉट नं. १३३,
चौधरी मिष्ठांन सर्कल जवळ,
सेक्टर २, उलवे, नवी मुंबई.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) संचालक, विद्यार्थी विकास, चर्चगेट.
२) वित्त व लेखा अधिकारी, फोर्ट
३) सहायक कुलसचिव, विधी कक्ष, फोर्ट
४) सहायक कुलसचिव (वित्त व लेखा), वेतन व देयके, फोर्ट
५) सहायक कुलसचिव (१/२/३), मानव संसाधन विकास कक्ष, फोर्ट
६) स्वीय सहायक : (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु (३) कुलसचिव